INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# नवोदत्तर मराठी बालनाट्य स्वरूप: एक अभ्यास

**आशा दौलतराव राजगुरू**

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/09.2021-23198983/IRJHIS2109019

***सारांश :***

*बालनाट्य हे मुलांच्या मनाला समजून घेणारी नाटके आहेत. त्यांना समजून सांगण्यासाठी बालनाट्य हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. बालनाट्यमध्ये मुलांच्या मनाचा विचार केला जातो. आज मुलांवर मनोरंजनाच्या नावाखाली कुसंस्कार घडताहेत चालू असणारे चित्रपट, मालिका, हिंसा दर्शवणारी व्हिडिओ आपल्या संस्कृतीच नातं जपणारी आहेत. आजच्या काळात आई-वडील दोघेही नोकरीला असल्यामुळे त्यांचा वेळ हा घराबाहेर असतो. या काळात मुले एकटीच असतात त्यांच्या मानसिकतेचा विचार केला जात नाही त्यांच्यासाठी कुणालाही वेळ नसतो.. अशा वेळी त्यांना बालनाट्याची साथ मिळाली तर त्यातून मनोरंजन तर होईल पण सोबत मित्र भेटल्याचा आनंद मुलांना मिळेल व संस्कारही घडतील.*

*मुलांची मन मातीच्या गोळ्यासारखे असतात.आपण जसं घडलं तसं ते घडतात त्यामुळे आपण त्यांना काय दाखवतो काय ऐकतो ही खूप मोठी जबाबदारी आहे. यात बालनाट्यसारखं एक माध्यम महत्त्वाचं ठरतं. जी गोष्ट अनेक प्रकारे अनेक शब्दात सांगून त्यांच्यापर्यंत पोहचत नाही ते एका लहानशा नाटकातून प्रभावीपणे मांडता येते. हे फक्त पाहण्यासाठी प्रभावी नसतात तर बालकांनी स्वतः त्यात सहभाग नोंदवला तर त्यातून त्यांना मिळणारा आनंद त्यांचे सादरीकरण, त्यांच्या पालकांनी पाहणं, पाहणाऱ्यांनी त्यांचं कौतुक करणं आणि स्पर्धेतून प्रोत्साहन मिळणं या सगळ्या गोष्टी आणि बाल वय हे त्यांच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण ठरू शकतात..*

***महत्वाचे शब्द :*** *बालनाट्य, बालसाहित्य, प्रयोगशीलता , वाङमयीन मूल्यमापन, निवेदन शैली इ.*

**प्रस्तावना :**

नाटक हे मराठी साहित्यातला एक महत्वाचा वाङमय प्रकार आहे.. यातून मानवी जीवन प्रत्यक्षात उतरवले जातात. कथानक मात्र चित्र वातावरण निर्मिती भाषाशैली निवेदनशैली नाट्य आकाराला येतात बालजीवन जगत असताना त्यांच्यावर अनेक संस्कार शिकवणं बालकांचे बोलणे म्हणे वागणे त्यांच्यात होणारे संवाद या गोष्टी विविध बालनाट्यातून येतात. भारतीय रंगभूमीला मोठा इतिहास लाभलेला आहे. रंगभूमीवरील नाटकात कथानकाच्या आवश्यकतेनुसार वयानुसार बालकलाकार असू शकतात. बाल नाट्यलेखनात वास्तव याबरोबरच मनोरंजन आत्ता आणण्याचा प्रयत्न बालसाहित्यिक करत असतो म्हणून

बालनाट्य हे संस्कारक्षम अभ्यासात्मक आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर बालनाट्य खरी सुरुवात झाली. त्यानंतर गणेशोत्सव, शारदोत्सव, शाळा, संमेलन इत्यादी माध्यमातून बालनाट्य उदयास आली. प्रतिथयश लोकांकडून प्रेक्षकांसाठी अप्रतिम बालनाट्य लिहिलेली आहेत. लेखकांची भाषाशैली मनोरंजनात्मक लेखन, अभिरुची, अभिव्यक्ती हे बालनाट्य साहित्य आजही विविध उपक्रम स्पर्धेद्वारे बालनाट्य प्रोत्साहन देत आहेत. परंतु संशोधनाच्या दृष्टीने बालनाट्य संशोधन यापासून दुर्लक्षित झालेले आढळून येते.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या व जागतिकीकरणाच्या युगामध्ये चित्रपटाद्वारे आपण प्रत्येक गोष्ट पाहू शकतो. परंतु प्रत्यक्ष रुपात अभिनय पाहणे व त्यातून शिकवण देणे हे काम फक्त बालनाट्य करू शकतात .व्यासपीठाची भीती कमी होऊन स्वतः बोलण्याची सवय लागते तसेच नावीन्यपूर्ण गोष्ट सादर नाट्यातील मोकळा अभिनय . करण्याचा आत्मविश्वास यातून, बोलक्या हालचाली प्रसंग, विशिष्ट लकबी प्रेक्षकांपुढे सादर करणे खूप आवश्यक असते. त्यातील प्रसंग घटना खुलविण्यासाठी गाण्याचा उपयोग केल्यामुळे मुलांना आवडतात. तंत्रज्ञान व कौटुंबिक व्यस्तपणा अशा परिस्थितीत बालनाट्य आजच्या काळात मुलांना शिकवण संस्कार देण्याचे उपयुक्त माध्यम आहे. हे अशा प्रकारे विविध बालनाट्य यांचा अभ्यास करून मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो व त्यातून उद्याचे साहित्यिक घडवले जाऊ शकतात.

**उद्दिष्टे -**

१. नव्वदोत्तर मराठी बालनाट्य साहित्याची संकल्पना व स्वरूप अभ्यासणे.

२. मराठी बालनाट्य विषयातील वैविध्यता अभ्यासणे..

३. मराठी बालनाट्याची आशय सूत्रे अभ्यासणे.

४. मराठी बालनाट्यातील निवेदनशैली व भाषाशैली अभ्यासणे..

५. मराठी बालनाट्य लेखनाची विविध तंत्रे अभ्यासणे.

६. नव्वदोत्तर मराठी बालनाट्याची प्रयोगशीलता अभ्यासणे..

७. मराठी बालनाट्यातून मिळणारे संस्कार याचा अभ्यास करणे..

**परिकल्पना -**

१. नवोदत्तर मराठी बालनाट्यांच्या मदतीने लहान मुलांमध्ये संस्कार रुजवले जाऊ शकतात.

२. बालनाट्य सहभागामुळे बालकांची व्यासपीठाची भीती कमी होऊन स्वतः बोलण्याची सवय लागते.

३. बालनाट्यातील अभिनय, विशिष्ट लकबी, प्रेक्षकांपुढे सादर करणे खूप प्रभावी ठरू शकते.

४. बालनाट्यातून उद्याचे साहित्यिक घडवले जाऊ शकतात.

५.बालनाट्यातून विविध भाषा विषय समजले जाऊ शकतात..

**कार्यपद्धती -**

नवोदत्तर मराठी बालनाट्याचे अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन कार्यपद्धतीचा उपयोग करावा लागेल .या पद्धतीमुळे बालनाट्य याचा अभ्यास करताना त्यातील प्रत्येक घटकांचे वर्णन केल्या जाईल व विश्लेषण स्वरूपात ते मांडता येतील..

**निष्कर्ष -**

बालजीवनाच्या संस्कारांना स्पर्श करणारी बालनाट्य ही मराठी साहित्यातील महत्त्वाचा घटक आहे. लहान मुलांच्या जीवनाचे विविधांगी आणि परिस्थिती व मनाला स्पर्श करणारे चित्रण अनुभवायास येताना दिसतात.

नवोदत्तर मराठी बालनाट्य ही बदल त्या काळानुसार बालमनाचे दर्शन करणारी आहे. बालक हे केंद्रस्थानी असून त्यांच्या जीवनाला अनुभवाचा खोलवर वेध घेण्याचा घेण्याच्या प्रयत्नातून मराठी बालनाट्य निर्मिती केली जाते. चिरंतर मानवी मूल्यांची जोपासना दुःखांचा परिहार व संस्कार शिकवण भयमुक्त समाजनिर्मिती इत्यादी मूल्यांची जोपासना ही नवोदत्तर मराठी बालनाट्यातून केली जाते. तसेच पर्यावरणविषयक, कौटुंबिक जीवनाविषयी, वैज्ञानिक दृष्टिकोण, आनंद जीवन विषयक मानवी मूल्य, समानता विषयी मुलांमध्ये जागृती निर्माण करता होऊ शकते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१. मराठी मराठी विश्वकोश पृ .४५१

२. अधिकारी गो. गो. (संपादक), भरत मुनींचे नाट्यशास्त्र, अधिकारी प्रकाशन, दुसरी आवृत्ती पृ .२

३. केतकर गोदावरी, भरत मुनींचे नाट्यशास्त्र, आवृत्ती दुसरी १९७३

४. देशपांडे पु. ल., मराठी रंगभूमी: मराठी नाटक

५. काळे के. ना., नाट्य विमर्श: बालनाट्य: प्रथम आवृत्ती मे १९६१ पृ १०२,१०३

६. डॉ. देशपांडे अ. ना., आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, खंड १,२

७. प्रज्ञा गाणोरकर व इतर (संपादक), वाङमयीन संज्ञा संकल्पना कोश